पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई. यांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतील तीन व रवींद्र नाटयमंदिर येथील दोन मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि. उव्दाहने यांच्याकडून बसवून घेण्यात आलेली आहे त्या उदवाहनांच्या दुरूस्तीस कार्योत्तर मंजूरी अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पुलदे - २०१९/ प्र.क्र.२७/सांका.-२.
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३१ मार्च, २०१९.

वाचा : प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र. पुलदे/११३१, दि.२०.०३.२०१९.

प्रस्तावना:-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथील अकादमीतील तीन व रवींद्र नाटयमंदिर येथील दोन मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि. उव्दाहने यांच्याकडून बसवून घेण्यात आलेली असून सदर उदवाहनांची वार्षिक देखभाल मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि. करण्यात येते. अकादमीतील ३ नादुरूस्त दुरुस्त करण्यासाठी ऑक्टोबर २०१५ मध्ये कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर बाबतचे देयकास कार्योत्तर मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथील अकादमीतील तीन व रवींद्र नाटयमंदिर येथील दोन मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि. उव्दाहने यांच्याकडून बसवून घेण्यात आलेली असून सदर उदवाहनांची वार्षिक देखभाल मे.लि.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि. करण्यात येते. अकादमीतील ३ नादुरूस्त दुरुस्त करण्यासाठी ऑक्टोबर २०१५ मध्ये कार्यादेश देण्यात आलेले होते. त्याबाबच्या देयकास खालील तक्यात दर्शविण्यात आल्यानुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कंपनीचे नांव	देयक क्रमांक व दिनांक	रक्कम रुपये
१.	मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि.	ESC/MAINT/REP/V/४०५, दि.४.६.२०१६	४,३७,३९५/-
२.	मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि.	ESC/MAINT/REP/V/४०६, दि.४.६.२०१६	३,२५,७०१/-
३.	मे.एस्कॉन एलिवेटर्स प्रा.लि.	ESC/MAINT/REP/V/४०७, दि.४.६.२०१६	१०,६०,३३४/-
		एकूण	**१८,२३,४३०/-**

०२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.झेड डी-२, २२०५ कला व संस्कृती (००) (१०१) ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (२२०५ १४६३) १३ कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात यावा.

०३. प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. १५५/२०१९/व्यय-१५, दि. ३१.०३.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३३११७३५४७०४२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.03.31 17:46:07 +05'30'

(बाळासाहेब सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
३) अवर सचिव (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) संचालक, M/s. Escon Elevators Pvt. Ltd. मुंबई.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८) निवड नस्ती, सां.का.२.